# वंचित विकास

संचालित

# नीहार आनंद निवास

..........नातं हळुवार जपलेलं

"बोलायला कुणीचं नसणं यापेक्षा आपण बोललेलं समोरच्या पर्यंत न पोचणं ही शोकांतिका जास्त भयाण..." असं प्रसिध्द लेखक व.पु.काळे यांनी म्हटलं आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे उतार वयात अनेकांच्या नशिबी ही शोकांतिका येते. आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण आणि उदारीकरण या तीन 'करणां'च्या रेट्यात आज आपले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन घुसळून निघाले आहे. या घुसळणीत आपली कुटुंबव्यवस्था पूर्णपणे बदलली आहे. उद्योग–व्यवसायांच्या उपलब्धतेनुसार तरुण पिढी परगावी, परदेशी जाण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे एकटे राहण्याची वेळ ज्येष्ठ नागरिकांवर येते. अर्थात् नेहमीच ज्येष्ठांच्या एकटे राहण्याला दुःखाची किनार असते असे नाही. बदलल्या काळानुसार वय, जीवनपध्दती, आर्थिक परिस्थिती यांची समीकरणे बदलली आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकही स्वतंत्रपणे जगण्याच्या पर्यायांचा विचार करू लागले आहेत. साठीनंतर सुरु झालेली सेकंड इनिंग भरभरून जगण्याची इच्छा आज अनेकांच्या मनात निर्माण होऊ लागली आहे. अशा वेळी एकटे राहण्यापेक्षा समवयस्क, समविचारी, मित्र–मैत्रिणींची सोबत मिळाली तर दुधात साखरच. त्याचकरता घरच्यासारखे वातावरण, निसर्गरम्य परिसर आणि आवश्यक त्या सोईसुविधा यांनी युक्त अशा 'सेकंड होम''ची गरज भासू लागली आहे. ही गरज पूर्ण करण्याकरताच 'वंचित विकास' या संस्थेतर्फे 'नीहार आनंद निवास' सुरू करण्यात येत आहे.

वंचित विकास संस्थेशी आपण परिचित आहातच. कै.विलास चाफेकर यांनी अक्षरशः रक्ताचे पाणी करून ही संस्था उभी केली. गेली ३५ वर्षे संस्था स्त्रिया, मुले, शहरी, ग्रामीण गरीब, शेतकरी, शेतमजूर यांच्या जीवनात परिवर्तन, घडवून आणण्यासाठी झटते आहे. अनेक निष्ठावान कार्यकर्ते संस्थेने तयार केले.

बदलत्या काळाची गरज ओळखून नवे प्रकल्प उभे करण्याचे बळ चाफेकर सरांनीच कार्यकर्त्यांना दिले. त्यानुसार 'नीहार आनंद निवास' आपल्या सेवेला येत आहे. वाढत्या वयामध्ये लागणारा भावनिक आधार मिळेल याची व सर्व प्रकारची शारिरीक, मानसिक काळजी येथे घेतली जाईल. समवयस्कांबरोबर निसर्गाच्या सान्निध्यात, प्रसन्न वातावरणात मनासारखे आयुष्य ज्येष्ठांना येथे व्यतीत करता येईल. मग संध्याछाया भिववणाऱ्या कशा असतील ?

**चला तर मग नीहार आनंद निवासला सेकंड इनिंग सुरू करायला.**

**पत्ता :** नीहार आनंद निवास, स. नं. २३/२/२अ, लोहगाव–वडगाव शिंदे रस्ता,
लोहगाव पुणे–४११०४७ भ्रमणध्वनी क्र. ८६००५१५६०४








## * वैशिष्ठ्ये *

* २४ तास पाणीपुरवठा उपलब्ध
* सात्विक व समतोल आहार
* उत्तम सुरक्षा व्यवस्था
* स्वच्छता व टापटीप
* घरकुलाच्या गरजा भागविण्यासाठी भाजी–पाल्याचा खाजगी मळा
* आरोग्य सुविधा,रुग्ण वाहिकेची सोय
* समुपदेशन
* प्रेमाने व आपुलकीने वागणारे कार्यकर्ते
* सुसज्ज वाचनालय
* मनोरंजनाचे कार्यक्रम तसेच विविध सहलींचे आयोजन

| अनामत रक्कम | स्वतंत्र खोली | दोन व्यक्तिंसाठी | चार व्यक्तिंसाठी |
|---|---|---|---|
| रु.२५,०००/– | रु.२२,०००/– | रु.१५,०००/– | रु.१२,०००/– |

जागा उपलब्ध असल्यास एक किंवा अधिक दिवस निवासाची सुविधा मिळेल
रु. १०००/–एका व्यक्तिचे एका दिवसासाठी

ई मेल : vanchitvikas85@gmail.com

संपर्कसाठी पत्ता : ४०५/९ नारायण पेठ, मोदी गणपतीमागे, पुणे ४११०३०
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२४४५४६५८, २४४८३०५० भ्रमणध्वनी : ७९७२०८६७३०